मुलांसाठी बाइबल
प्रस्तुत



# दानिएल आणि सिंहाची गुहा

लेखक: Edward Hughes

रेखाचित्रकार: Jonathan Hay

रूपान्तरकार: Mary-Anne S.

अनुवादक: Rev. Shilas Gavit

निर्माता: Bible for Children
www.M1914.org

©2017 Bible for Children, Inc.
परवाना (लाइसेंस): तुम्ही जोपर्यंत ही गोष्ट विकत नाहीत, तोपर्यंत तुम्ही तीं कॉपी किंवा मुद्रित करू शकता.

दारायावेश हा बाबेलचा नविन राजा होता. तो हुशार व चलाख राजा होता. त्याने त्याच्या राज्यातील एकशेंवीस उत्कृष्ट लोकांची निवड करुन त्याने ...



... त्यांना राज्यकारभार चालविण्यास हाती घेतले.
आणि मग त्याने तिन जणांना त्यांच्यावर प्रमुख नेमले,
त्या तिघांपैकी
दानिएल हा
एक होता.



दारयावेश राजा दानिएलचा फार सन्मान करित असे, त्याला सर्व राज्यावर नेमावे असा राजाचा विचार होता.



इतर पुढाऱ्यांना याचा हेवा वाटला. दानिएलला राजासमोर अडचणीत आणता यावे म्हणून ते दानिएलमध्ये काही चुका शोधण्याचा प्रयत्न करु लागले.



त्यांनी कितीही प्रयत्न केला तरी या पुढाऱ्यांना दानिएलमध्ये काहीही चुक आढळली नाही. दानिएल जे काही करी त्या सर्वांत तो राजाबरोबर खरे वागे. तसेच तो सावधगिरी बाळगून आपले सर्व काम हुशारीने त्याला जितके अधिक चांगले करता येईल तितके करी.



दानिएलला अडचणीत पकडण्यासाठी केवळ एकच मार्ग होता हे त्या हेवा करणाऱ्या पुढाऱ्यांना माहित होते.

इस्त्राएलच्या देवाची भक्ति करण्यास या जगातील कोणीही दानिएलला थांबवू शकत नाही हे त्यांना माहित होते.






दानिएलच्या विरोधकांनी
एक योजना तयार केली.
राजाने मंजुर करावा असा
त्यांनी एक नविन कायदा
तयार केला. त्या कायद्यात
असे म्हटले होते की प्रत्येकाने
केवळ दारयावेश राजाचीच
आराधना करावी. जो
कोणी आज्ञाउल्लंघन
करिल त्याला सिंहाच्या
गुहेत टाकण्यात यावे !

दारयावेश राजाने नविन कायद्यावर सहि केली.



नविन कायद्यामुळे दानिएलवर काहीएक फरक पडला नाही. तो जी गोष्ट हमेशा करित होता तीच त्याने केली. त्याने त्याच्या घराची खिडकी उघडी ठेवून दिवसातून तिन वेळा स्वर्गीय देवाची प्रार्थना केली.







हेव्याने भरलेले
पुढारी लगबगीने
हि गोष्ट राजाला
सांगण्यास गेले.
दानिएलला अटक
करण्याशिवाय
दारयावेश
राजाकडे दुसरा
पर्याय नव्हता.



कायद्याचे पालन होणे आवश्यक होते. दानिएलला आता मरावे लागणार होते. कायद्यामध्ये काही बदल होऊ शकतो का याविषयी राजाने पुष्कळ प्रयत्न करुन पाहिले, परंतू राजा काहीही करु शकला नाही.

दानिएलला सिंहाच्या गुहेत टाकून मारण्याची शिक्षा सुनावण्यात आली. उपाशी सिंहांच्या गुहेत टाकण्याच्या आधि, राजाने दानिएलला म्हटले, "ज्या देवाची तूं नित्य सेवा करितोस तो तुला सोडविल !"



त्या रात्री राजाची झोप उडाली होती. दुसऱ्या दिवशी मोठ्या पहाटेस राजा त्वरेने सिंहांच्या गुहेजवळ गेला.





दारयावेश राजा गुहेजवळ
जाऊन शोकस्वराने ओरडला,
"हे दानिएला, जिवंत देवाच्या
सेवका, ज्या देवाची तूं नित्य
सेवा करितोस त्याला
सिंहांपासून तुला सोडविता
आले आहे काय?" परत उत्तर
येईल अशी त्याने कदाचित
अपेक्षा केली नसेल. परंतू
दानिएलने उत्तर दिले !

दानिएल
राजास म्हणाला,
"महाराज, माझ्या देवाने
आपला दिव्यदूत पाठवून सिंहांची
तोंडे बंद केली आहेत; त्यांनी मला
कांहीएक उपद्रव
केला नाही;
व महाराज
आपलाही मी
काही अपराध
केला नाही."



तेंव्हा दारयावेश राजा फार आनंदीत झाला ! त्याने दानिएलला गुहेतून बाहेर काढण्याची आज्ञा केली.



देवाने दानिएलला
वाचवले आहे आणि
दानिएलचे शत्रू ते
देवाचे शत्रू आहेत
हे राजाला
कळले होते.



ज्यांनी राजाला वाईट कायद्यावर सही करण्यास फसवील होते त्या सर्वांना राजाच्या आज्ञेवरुन सिंहांच्या गुहेत टाकण्यात आले. सिंहांनी त्यांना खाऊन टाकले.



स्वर्गीच्या देवाने त्याचा विश्वासू सेवक दानिएल याला वाचवले आहे हे सर्व जगाला कळावे अशी दारायावेश राजाची इच्छा होती. राजाने एक पत्र लिहीले त्यात सर्वांनी केवळ जिवंत देवाचीच भक्ति करावी असा आदेश देण्यात आला होता. आणि राजाने दानिएलला पुन्हा त्याच्या पदावर आणि सन्मानास चढविले.



दानिएल आणि सिंहाची गुहा

परमेश्वराची वाणी - बाइबल मधून गोष्ट

घेण्यात आली आहे

दानिएल ६

"तुझ्या वचनांच्या उलगड्याने प्रकाश प्राप्त होतो."
स्तोत्रसंहिता ११९:१३०

# समाप्त

बाइबलमधील ही गोष्ट आम्हांला आमच्या सुंदर ईश्वराविषयी सांगते ज्याने आम्हांला बनविले आणि ज्याची इच्छा अशी आहे की आम्ही त्याला ओळखावे.

ईश्वराला माहित आहे की आम्ही वाईट गोष्टी केल्या आहेत, ज्याला तो पाप म्हणतो. पापाची शिक्षा मृत्यू आहे, पण ईश्वर तुमच्यावर इतके प्रेम करतो की त्याने तुमच्या पापांसाठी शिक्षा मिळावी आणि क्रॉसवर मरण यावे म्हणून त्याच्या एकुलत्या पुत्राला येशूला पाठविले. नंतर येशू पुन्हा जिवंत झाला आणि स्वर्गातल्या घरी गेला. जर तुम्ही येशूमध्ये विश्वास ठेवता आणि तुमच्या पापांसाठी त्याने क्षमा करावी अशी त्याला विनंती करता, तर तो नक्की क्षमा करील. तो आता तुमच्याबरोबर येऊन राहील आणि तुम्ही त्याच्याबरोबर कायम राहणार.

जर हे सत्य आहे यावर तुम्ही
विश्वास ठेवता, तर ईश्वराला हे सांगा:

प्रिय येशू, तू ईश्वर आहेस आणि माझ्या पापांसाठी मृत्यू भोगण्यास मनुष्य बनलास आणि आता तू पुन्हा जगतोस यावर माझा विश्वास आहे. कृपा करून माझ्या जीवनात ये आणि माझ्या पापांसाठी मला क्षमा कर, जेणेकरून आता मला नवीन जीवन प्राप्त होईल, आणि एक दिवस मी कायम तुझ्याबरोबर राहण्यासाठी निघेन. तुझी आज्ञा पाळण्यासाठी आणि तुझे मूल होऊन जगण्यासाठी मला मदत कर. आमेन.

बाइबल वाचा आणि ईश्वराशी रोज बोला!
जॉन 3:16